महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड , मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ईमेल-: pmu@mahapocra.gov.in

पत्र क्र. नादेकृसंप्र-०९२०/प्र.क्र.१५१/ आय-टी /१९६ दिनांक: १४ .०२ .२०२४

प्रती,

__________

__________

**विषय:- टेलिफोन सिस्टीम (EPABX systems) मशिनची वार्षिक देखभाल व दुरूस्तीकरिता विविध पुरवठादाराकडून सर्वसमावेशक (Comprehensive A.M.C.)दरपत्रके मागविण्याबाबत ..**

१ . आपणास खालील मशीनची वार्षिक देखभाल व दुरूस्तीची सेवा (सर्वसमावेशक) पुरवठा करणेसाठी स्पर्धात्मक दर सादर करणे बाबत विनंती करण्यात येत आहे.

| मालाचे / साहित्याचे वर्णन | तांत्रिक निकष | संख्या | सेवा पुरवठा करण्यासाठीचा कालावधी | वार्षिक देखभाल करणे आणि दुरुस्ती करावयाचे ठिकाण | स्थापनेसाठी आवश्यकता (Installation Requirement) |
|---|---|---|---|---|---|
| **Panasonic TD 1232 PBX system with 48 Extension and Digital Phone with service** | सर्वसमावेशक वार्षिक देखभाल व दुरूस्ती. | १ | दर महिन्यानंतर एकदा, तसेच मशीनमध्ये बिघाड झाल्याच्या प्रसंगी. | नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, ३० अ/ब -अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५. | आवश्यकतेनूसार |

२. शासनास जागतिक बँकेकडून नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पासाठी निधी मंजूर झालेला आहे. सदर निधी मधील काही रक्कम या दरपत्रका अन्वये देण्यात येणाऱ्या पुरवठा आदेशानूसार करावयाच्या पात्र प्रदानासाठी वापरण्यात येणार आहे.

**Panasonic TD 1232 PBX system ची वार्षिक देखभाल व दुरूस्ती (सर्वसमावेशक) चा तांत्रिक निकष पुढीलप्रमाणे आहे.**

१.Panasonic TD 1232 PBX system cabinet Comprehensive Annual Maintenance quotation (AMC)

२.Approx. 48 Extension & Digital Phone with service

३. निविदा किंमत

अ. करार हा वरील नमूद केलेल्या मशीनच्या सर्वसमावेशक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे व मशीन कार्यरत करून देण्यासाठी असेल त्यात काही बदल असु शकेल.

ब. वार्षिक देखभाल व दुरूस्तीकरिता आवश्यक सुट्ट्या भागाचा पुरवठा व कार्यन्वयनाच्या एकूण किंमतीमध्ये सर्व कर व उपकर यांचा समावेश असेल.

क. वस्तू व सेवाकर वेगळा दाखविण्यात यावा.

ड. निविदाकाराने सादर केलेले दर हे आदेशातील कालावधीसाठी स्थिर असतील व त्यात कोणत्याही कारणामुळे बदल होणार नाही.

इ. दरपत्रकातील दर हे भारतीय रुपयात सादर करावेत.

४. प्रत्येक निविदाकार एकच सिलबंद दरपत्रक सादर करेल. या दरपत्रकाबाबत निविदाकार इतर निविदाकारांशी संपर्क करणार नाही.

५. <u>दरपत्रकाची वैधता</u>

दरपत्रक सादर करावयाच्या अंतिम तारखेपासून ४५ दिवसापर्यंत दरपत्रक वैध राहील.

६. <u>दरपत्रकांचे तांत्रिक मुल्यमापन:</u>

अ. मागील आर्थिक वर्षात कमीत कमी रु. २५,०००/- पर्यंत या पद्धतीने काम केल्याचे प्रमाणपत्र
ब. मागील तीन वर्षात केलेल्या कामांचे पुरवठा आदेश.
क. शॉप ॲक्ट लायसन्स

तांत्रिक मूल्यांकनात बाद होणारया पुरवठादाराला संपूर्ण प्रक्रियेतून बाद करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

७.<u>दरपत्रकांचे आर्थिक मुल्यमापन</u>

खरेदीदार खालील बाबींबाबत निविदाकारांनी दिलेल्या प्रतिसादाशी दरपत्रकांची तुलना व मुल्यमापन करेल.
अ. दरपत्रके योग्य प्रकारे स्वाक्षरी केलेले आहेत.
ब. दरपत्रकातील अटी, शर्ती व निकषांची पूर्तता करतात.
क.दरपत्रकातील सर्व वस्तुंची तुलना व मुल्यमापन एकत्रित करण्यात येईल त्यानंतर सर्वात कमी दर असलेल्या (Least Cost Selection) दरपत्रकाची निवड करण्यात येईल.
ड.वस्तु व सेवाकर दरपत्रकांचे मुल्यमापन करण्यासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही.

८. <u>आदेश</u>

ज्या निविदाकाराचे दरपत्रक सर्वात जास्त प्रतिसादात्मक (Most Appropriate Bid) असून ज्याचे दर हे सर्वात कमी (Less) आहेत त्या निविदाकास आदेश देण्यात येईल.

८.१.खरेदीदारास कोणतेही दरपत्रक मान्य करण्याचा वा अमान्य करण्याचा अधिकार व दरपत्रकांची प्रक्रिया रद्द करुन सर्व दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार करारनामा करण्याच्या अगोदर राहील.

८.२ज्या निविदाकाराचे दर मान्य करण्यात आलेले आहेत त्यांस पुरवठा आदेश देण्यात येईल मान्य केलेल्या दराबाबतच्या अटी पूरवठा आदेशामध्ये समाविष्ट करण्यात येतील.

८.३ पुरवठा कालावधी-: पुरवठा आदेशाच्या तारखेपासून १ वर्ष किंव्हा प्रकल्पाचा टप्पा १ पूर्ण होई पर्यंत

८.४ सेवापूरवठादाराची सेवा समाधानकारक वाटल्यास आवश्यकतेनुसार सदर सेवा पुढील काळाकरिता वाढविण्याचे अधिकार मा. प्र.सं.यांना राहतील.

**९.देयक अदायगीचे स्वरुप :** वार्षिक देखभाल दुरूस्तीचे देयक प्रत्येक तीन महिन्यांनी समाधानकारकरित्या काम पूर्ण झाल्याचा अहवाल प्रकल्पाच्या प्रशासन शाखेने दिल्यावर चार आठवड्यांच्या आत देयक अदा करण्यात येईल.

१०. पुरवठा केलेल्या सेवेसाठी सामान्य व्यावसायिक हमी (Warranty/ Guaranty) लागू राहील.

११. आपणांस विनंती करण्यात येते की,सोबत सहपत्रित केलेल्या दरपत्रक सादर करावयाच्या नमुन्यात आपले **सिलबंद दरपत्रक दि. २७/०२/२०२४ पर्यंत दुपारी ३:०० वाजेपर्यंत** सादर करावे. सदर दरपत्रकाच्या लिफाफ्यावर दरपत्रकाचा विषय व दरपत्रक उघडण्याची तारीख व दिनांक नमूद करण्यात यावा. सदर **दरपत्रक दि. २७/०२/२०२४ रोजी दुपारी ०३:३० वा** उघडण्यात येईल.

१२..दरपत्रक सादर करताना तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा स्वतंत्रपाने सादर करणे आवश्यक आहे. एकाच लिफाफ्यात तांत्रिक व आर्थिक कागदपत्रे सादर केल्यास संबंधित पुरवठादाराला संपूर्ण प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

आम्हाला आशा आहे की, आपण आपले दरपत्रक सादर कराल तसेच, आपण या प्रकल्पात इच्छा दाखविल्याबाबत धन्यवाद.

दिनांक :
ठिकाण : मुंबई

नाव: शैलेश नाईक
हुद्दा: सहाय्यक प्रकल्प संचालक

सोबत:वरीलप्रमाणे.

दरपत्रक सादर करावयाचा नमुना

(कंपनीचे लेटरहेडवर)

दिनांक:

प्रति,
प्रकल्प संचालक,
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड ,
मुंबई ४०० ००५.

विषय:- टेलिफोन सिस्टेमस (EPABX systems) मशिनची वार्षिक देखभाल तसेच मशीन दुरूस्तीकरिता विविध पुरवठादाराकडून सिलबंद दरपत्रक.

संदर्भ: आपले पत्र जा. क्र. नादेकृसंप्र-०९२०/प्र.क्र.१५१/ आय-टी/ दि.

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने टेलिफोन सिस्टेमस (EPABX systems) मशिनच्या वार्षिक देखभाल तसेच मशिन दुरुस्तीकरिता खालीलप्रमाणे सिलबंददरपत्रक सादर करीत आहोत.

| अ.क्र | वस्तुचे /मालाचे वर्णन | निकष | संख्या | एकक (युनिट) | वार्षिक देखभाल व दुरूस्तीची रक्कम (रुपये) | जी.एस.टी. दर (रुपये) | एकूण रक्कम (जी.एस.टी.सह) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Panasonic TD १२३२ PBX system with ४८ Extension and Digital Phone with service | वार्षिक देखभाल व दुरूस्ती. | १ | मशीन | | | |

A) Annual Maintenance Quotation (Comprehensive AMC)

- वरील तांत्रिक निकषाप्रमाणे टेलिफोन सिस्टेमस (EPABX systems) मशिनची वार्षिक देखभाल व दुरुस्तीची सेवा
एकूण किंमत रुपये ............ (अक्षरी रुपये ...........................) ( जी.एस.टी.सह) व दरपत्रकात नमूद कालावधीमध्ये करण्यास आम्ही तयार आहोत.
- तसेच AMC कालावधीमध्ये एखादे सुट्टे भाग पुरवठा केलयास मालासाठी सामान्य व्यावसायिक हमी (Warranty/ Guaranty) लागू राहील याची आम्ही खात्री देतो.
- तसेच आम्ही प्रमाणित करतो की, आमच्यासाठी किंवा आमच्या वतीने काम करणारी कोणतीही व्यक्ती ही भ्रष्ट मार्ग अवलंबणे, फसवेगिरी करणे, संगनमत करणे, दडपशाही करणे, अडथळा आणणे इ. बाबींचा अवलंब हे दर पत्रक
सादर करतांना व करारनाम्याची पूर्तता करतांना करणार नाहीत, याबाबत आम्ही योग्य त्या उपाययोजना केलेल्या आहेत.
- आमचा जी.एस.टी. क्रमांक ___________ आहे.

(पुरवठादाराची स्वाक्षरी/शिक्का)

दिनांक :

ठिकाण :

नाव:

हुद्दा :

पत्ता :

दुरध्वनी क्र: